# जा हि रा त

**पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड** परिक्षेत्राच्या अधिनस्त असलेल्या पोलीस अधीक्षक, नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली यांचे आस्थापनेवरील विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात.

........................................................................................................................

**पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत विधी अधिकारी (वर्ग—ब) व उप विभागीय कार्यालयातील विधी अधिकारी यांची पदे ११ महिने कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिनस्त कार्यालयाकरीता दिनांक २१.०८.२००६ च्या शासन निर्णयान्वये विधी अधिकाऱ्याच्या निर्माण केलेल्या पदांपैकी पोलीस उप महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र, नांदेड याचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या निवडमंडळ (समिती) द्वारे खालील नमूद विधी अधिकारी (वर्ग—ब) व विधी अधिकारी यांचे पदे करार तत्वावर/कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात (फक्त ११ महिन्यासाठी) भरावयाची आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे :—

| अ. क्र. | पदनाम | पोलीस उप महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातंर्गत भरावयाची पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नांदेड | परभणी | लातूर | हिंगोली | एकूण |
| १ | विधी अधिकारी (वर्ग—ब) | १ | १ | १ | १ | ४ |
| २ | विधी अधिकारी | १० | ६ | ७ | ३ | २६ |

* **सूचना:—** याबाबतचे अर्ज पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड कार्यालयात दिनांक ०८/०८/२०२६ पूर्वी सादर करावेत

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमून्यातील अर्ज लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी अधिकारी वर्ग—ब/विधी अधिकारी या पदासाठी अर्ज असे नमूद करून दिनांक ०८/०८/२०२६ पर्यत पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र कार्यालय, बसवेश्वर चौक, ट्रेझर बाजार (मॉल) समोर, नवीन कौठा, सिडको रोड, नांदेड ४३१६०३ या पत्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ०८ /०८/२०२६ नंतर या कार्यालयांस प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे आवश्यक त्या मुल्याचे पोस्टल तिकीटे लावून जोडावेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव याच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सोडाव्यात.

टिप :— १) सदरची जाहिरात www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर तसेच या कार्यालयाचे https://nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करून अर्ज परिपुर्णरित्या भरण्यात यावा.

२) परिक्षा शुल्क रू.५००/— (अक्षरी रूपये पाचशे फक्त ) ठरविण्यात आले असून, सदर परिक्षा शुल्क केवळ Demand Draft व्दारे स्विकारण्यात येईल. त्यामुळे अर्जासोबत DDO SPL IG OF POLICE NANDED RANGE यांचे नावे असलेला राष्ट्रीयकृत बॅकेचा Demand Draft अर्जासोबत जोडावा. अर्जासोबत Demand Draft नसलेले अर्ज बाद ठरविण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

३) महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक एसपीपी–२००५/प्र.क्र.२४७/पोल–१०, दि.१५.०९.२००६ अन्वये उक्त नमूद पदे दिनांक २१.०८.२००६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार नियमित वेतन श्रेणीत न भरता एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यास खालील अटीच्या अधीन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे. वर दिलेल्या पदसंख्येत/नियुक्तीच्या ठिकाणात बदली होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.

▶ **करारातील मासिक देय रक्कम :**

**अ)** विधी अधिकारी (वर्ग–ब) या पदाकरीता करारातील मासिक देय रक्कम रू.२५,०००/– + दुरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रू.३,०००/– असे एकूण रू.२८,०००/– दरमहा देय राहील. (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणांर नाहीत.

**ब)** विधी अधिकारी या पदाकरीता करारातील मासिक देय रक्कम रू.२०,०००/– + दुरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रू.३,०००/– असे एकूण रू.२३,०००/– दरमहा देय राहील. (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

▶ **शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा अनुभव :**

**१) शैक्षणिक अर्हता** :– उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व सनदधारक असेल

**२) वयोमर्यादा** :– विधी अधिकारी (गट–ब) व विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे सदर पदाचे नियुक्तीचे वेळीचे वय ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

**३)** जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल, त्याच प्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल, अशा व्यक्तिची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**४) अनुभव :–**

**अ)** विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी या दोन्ही पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहिल.

ब) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

**क)** उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**ड)** संगणकाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे

❖ **विधी अधिकारी (गट–ब) आणि विधी अधिकारी यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या :–**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे

२) सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशा तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे

७) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहित मुदतीत पार पारणे

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९) कायदा, सेवा व प्रशासनासंबंधी इतर अनुषंगिक कामे.

❖ **अटी व शर्ती :–**

१) सदर पदांची नेमणुक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी /अधिकारी म्हणुन गणले जाणार नाही.

२) सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात येतील ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा, ११ महिन्यांकरीता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्यांने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) उमेदवाराची निवड लेखी परिक्षेव्दारे तसेच मुलाखतीव्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल

५) उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

६) नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

७) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८) उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभव या अटी दि.०१/०७/२०२६ रोजीपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

९) अर्जासोबत २.५ से.मी. X २.५ से.मी. आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

**उमेदवारास आवश्यक त्या सुचना :–**

१) उपरोक्त सर्व नमूद अटी अर्हता व अनुभव असणारे तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी पात्र राहतील.

२) उपरोक्त पदांच्या भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

३) उपरोक्त पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची शिफारस किंवा गैरप्रकाराचा अवलंब करण्यात येऊ नये. असा प्रकार निदर्शनास आल्यास, ते उमेदवार निवडीस अपात्र ठरविण्यात येतील.

( **शहाजी उमाप** )
पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड

# अर्जाचा नमूना

**विधी अधिकारी गट–ब /विधी अधिकारी** पदाकरिता अर्ज

**नियुक्तीचे इच्छूक ठिकाण :–**. ____________ .

| एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा |
|---|

**कार्यालयीन उपयोगासाठी**

१. **अर्ज क्रमांक :** ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

२. **अर्ज स्विकारल्याचा दिनांक :** ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

३. **अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह) :**. ____________.

---

**सूचना** : अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

ज्या ज्या पदासाठी व ज्या ज्या जिल्हयासाठी अर्ज केला तेथे ( √) अशी खुन करावी.

| जिल्हा | नांदेड | परभणी | लातूर | हिंगोली |
|---|---|---|---|---|
| विधी अधिकारी (वर्ग–ब) | | | | |
| विधी अधिकारी | | | | |

## अर्जदारची वैयक्तीक माहिती :

**१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :–** आडनांव नांव वडिलांचे/पतीचे नांव

मराठीत :–..........................................................................................

इंग्रजीत :–..........................................................................................

**२. पत्रव्यवहाराचा पत्ता :–** ..........................................................................................

..........................................................................................

तालुका.................... जिल्हा.................... पिन कोड..............................................

**३ कायमचा पत्ता :–** ..........................................................................................

..........................................................................................

तालुका.................... जिल्हा.................... पिन कोड..............................................

**४ दुरध्वनी क्रमांक**..........................................**मोबाईल क्र**.. ..................................

५. ई–मेल : ........................................

६. **जन्म दिनांक :–**

| दिवस | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

५. **दि.०१/०१/२०२६ रोजीचे वय**

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

६ **जन्मस्थळ /ठिकाण :–**.................तालुका.................ज़िल्हा..................

७. **लिंग :–** योग्य त्या ठिकाणी (√) अशी खुन करावी.

| महिला | पुरूष |
|---|---|
| | |

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :

८ **शैक्षणिक अर्हता :**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव विद्यालय/महाविद्यालय | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी.) अथवा जूनी ११ वी परिक्षा | | | | | |
| २ उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२वी.) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |
| ५. पदव्युत्तर परिक्षा | | | | | |
| ६. ईतर | | | | | |

९. **इतर शैक्षणिक अर्हता :**

संगणक प्रशिक्षीत आहे काय : ? : होय ☐ / नाही ☐

( शासन मान्य एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम परिक्षा उर्तीण असल्यास त्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.

➢ **अर्जदाराची ईतर माहिती :—**

१०) **अ) सनद नोंदणी क्रमांक व दिनांक :**

ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेची संख्या |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**टिप : वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

१४) अ) अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / बध्द करण्यात/ दंड करण्यात/सिध्ददोषी ठरविण्यात आले आहे काय? किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परिक्षांना बसण्यास / निवडींना मनाई करण्यात आली आहे काय? किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय? किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय?/ काढून टाकण्यात आले काय? होय / नाही

ब) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? होय / नाही

(१४ अ किंवा १४ ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्द, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरण इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री./सौ./कु. ______________________________ . याव्दारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकिची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

सोबत : अर्जात नमुद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.